पुढारी MY कोल्हापूर मंगळवार, २८ जुलै २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये कारगिल विजय दिन

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने कारगिल विजय दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने कारगिल युद्धातील शहीद जवानांना अभिवादन करून त्यांच्या अद्वितीय शौर्याचे स्मरण करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना १९९९ मधील कारगिल युद्धाची पार्श्वभूमी, पाकिस्तान समर्थित घुसखोरी, भारतीय सैन्याने केलेली शौर्यपूर्ण लढाई व २६ जुलै रोजी मिळविलेल्या ऐतिहासिक विजयाची माहिती देण्यात आली. देशाच्या सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी भारतीय जवानांचे योगदान प्रेरणादायी असल्याचे सांगण्यात आले. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी विभागाचे लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा व डॉ. नम्रता नरेवाडीकर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

दैनिक
जनप्रवास
बातम्यांचा राजा
८
● मंगळवार, दि. २८ जुलै २०२६




# विवेकानंद कॉलेजमध्ये कारगिल विजय दिन

**जनप्रवास : कोल्हापूर**

२६ जुलै हा दिवस स्वतंत्र भारताच्या इतिहासातील सर्वात गौरवशाली दिवस म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. कोल्हापुरातील स्वामी विवेकानंद कॉलेजमध्येही हा दिवस साजरा केला गेला. यावेळी विद्यार्थ्यांना कारगिल युद्धाविषयी माहिती देण्यात आली.

भारतीय स्वातंत्र्यानंतर शेजारील राष्ट्रांपासून भारताच्या सार्वभौमत्वाला ऐक्याला आणि अखंडतेला आवाहन देण्याकरिता घुसखोरी दहशतवादासारख्या छुप्या घातक कृतीमधून वारंवार केला जातो. भारतीय संरक्षण दलामार्फत वारंवार होणाऱ्या या देश विघातककृतींना नेस्तनाबूत करण्याकरिता भारतीय जवान सीमेवर अहोरात्र देश धर्माचे पालन करतात. तीन मे १९९९ रोजी उत्तर भारतीय सीमेमध्ये समाजकंटक दहशतवाद्यांची घुसखोरी झाली आणि त्यांच्यासोबत निकराच्या लढाईत भारतीय लष्करी आणि निमलष्करी दलाचे अधिकारी आणि जवान शहीद झाले.

२६ जुलै १९९९ रोजी भारतीय सैन्याने दहशतवाद्यांचा बिमोड करून आपल्या अतुलनीय पराक्रमाचा आदर्श सर्व जगासमोर ठेवला. या २७ व्या विजय दिनाच्या स्मरणार्थ विवेकानंद कॉलेजमधील राष्ट्रीय छात्र सेनेद्वारा वीरांना आदरांजली आणि पराक्रमाचे स्मरण केले. कार्यक्रमाचे आयोजन एन. सी. सी. विभागातील लेफ्ट. जे. आर. भरमगोंडा, डॉ. नम्रता नरेवाडीकर यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली केले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा

● मंगळवार, दि. २८ जुलै २०२६

# 'विवेकानंद'मध्ये इंडस्ट्री इंटरअ‍ॅक्शन कार्यक्रम

कोल्हापूर : येथील विवेकानंद कॉलेजमध्ये बीसीएस विभागाच्या वतीने सायबर सिक्युरिटी या विषयावर इंडस्ट्री इंटरअ‍ॅक्शन कार्यक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी व्हाईट अ‍ॅरो सायबर सिक्युरिटी या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी ऋषीकेश वाळवेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी संगणक सुरक्षा, डेटा संरक्षण, आर्थिक फसवणूक टाळणे, बोगस लिंक, संदेश इत्यादी सायबर धोक्यांपासून कसे सुरक्षित रहावे याबाबत माहिती दिली. प्रास्ताविक प्रा. पल्लवी देसाई यांनी केले. आभार प्रा. राजेश माने यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.